महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र २२८२९३६८
Email ID :comp.fd@maharashtra.gov.in

वित्त विभाग, मंत्रालय (विस्तार), दालन क्र.३३३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

क्र.सीओएम-२०२२/प्र.क्र.०८/संगणक कक्ष, दिनांक : २९ एप्रिल, २०२२

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (ले.व को.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.
५. विशेष आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.
६. सह आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.
७. संचालक, लेखा व कोषगारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
९. उप सचिव (कोषा.प्रशा-४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. उप सचिव (कराधान), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. उप सचिव (उद्योग-४), उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई.

विषय - प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या ६५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

वित्त विभाग व वित्त विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांकरिता संगणकीकरण विषयक प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी समिती ( PIC ) गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची ६५वी बैठक दि.०८.०४.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सचिव (वि.सु.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

२. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडले आहे.

(पृ.२ ते ३५/प.वि.)

आपला,

( वि. अ. धोत्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्रः- वरीलप्रमाणे

प्रत :-

निवडनस्ती (संगणक कक्ष)

o/c
वसंपरब
२९/०४/2022

## विषय - प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) ६५व्या बैठकीचे इतिवृत्त.

वित्त विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची ६५ वी बैठक सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि.०८.०४.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांच्या दालनात, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली.

प्रस्तुत बैठकीस समितीचे पुढील सदस्य आणि अन्य संबंधित पदाधिकारी हजर होते :-

१. श्रीमती शैला ए., सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती,

२. श्री.राहुल द्विवेदी, सह आयुक्त, राज्य कर विभाग,

३. श्री.वि.अ.धोत्रे, उप सचिव (संगणक कक्ष), वित्त विभाग, मंत्रालय,

४. श्री.इंद्रजित गोरे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,

५. श्री.वैभव राजेघाटगे, संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय,

६. श्री.मल्लिनाथ उपासे, सह आयुक्त, राज्य कर विभाग,

७. श्रीमती राजश्री थोकट, सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय.

८. श्रीम.स्वप्नजा सिंदकर, सह संचालक, ले.व को. संचालनालय,

९. श्री.प्रसाद पी. शेडगे, सिनियर कन्सल्टंट, माहिती तंत्रज्ञान संचालनालय,

१०. डॉ.प्रज्ञा मनोहर, अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,

११. श्री.आर.बी.उगले, अवर सचिव (कराधान), वित्त विभाग,

१२. श्री.पी.वेंकट कृष्णन्, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई,

१३. श्री.अशोक चौधरी, कक्ष अधिकारी, कोषा.प्रशा-४, वित्त विभाग, मंत्रालय,

==========================================

बैठकीत खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले :-

==========================================

विषय क्र.१) **Extension of existing PMC i.e. M/s. E&Y for two months from 01.04.2022 to 31.05.2022 for automation project of MGSTD department worth Rs.409860/-**

**Discussion:**

It is informed that,

- As per DIT(MH) GR dtd.09th May 2019, PIC meeting held on 15th Mar 2021 had selected M/s. Ernst & Young LLP as PMC for the Base automation project of Maharashtra Goods & Service Tax Department for the period of 12 months from 01st Apr 2021 to 31st Mar 2022. Accordingly, Work Order no.1235, dated 05.04.2021 was issued. The contract period mentioned in work order was ended on 31st Mar 2022.
- MGSTD needed support of PMC for further period from Apr 2022 onwards also. Accordingly, as per clause no.5 of DIT(MH) GR dtd.09.05.2019, MGSTD has initiated the process of selection of new PMC for 12 months. However, the whole process of selection and onboarding of new PMC may consume more time may even after expiry of existing contract period.
- MGSTD needs continuous support of PMC for automation project. Hence, it was requested for extension of existing PMC i:e E&Y on urgent requirement basis for 2

months from 01st Apr 2022 to 31st May 2022 as per clause no.6 of DIT(MH) GR dtd.09.05.2019. The clause no.6 provides that the department may directly select any empanelled consultancy agency for the period of two months for an urgent requirement.

- The details of existing resources for extension period of 2 months from 01st Apr 2022 to 31st May 2022 are as under:

| Sr. No. | Particulars/ Scope | No. of Resources | Type of Consultant | Duration (in months) | Applicable Rate as per DIT GR dtd.09.05.2019 | Total Cost |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMO Support (Mahavikas & EIU) | 1 | Managing Consultant | 2 | 306900 | 613800 |
| 2 | Technical Support for SAP TRM/CRM Application, NIIT Project Review, Cloud migration assessment | 1 | Managing Consultant | 2 | 306900 | 613800 |
| 3 | IT FMS, SLA, nCode QGR vetting, RFP compliance monitoring, Vendor Management and Procurements | 1 | Consultant | 2 | 247500 | 495000 |
| 4 | GSTN Integration & E way Bill Support, NIIT GST T&M Monitoring and BRS review, monitoring development and roll out | 1 | Consultant | 2 | 247500 | 495000 |
| 5 | Technical Support for BIDW & Analytics in EIU, GST ETL implementation, PWC & NIC work monitoring, Short Term- Long Term Roadmap, support & monitor implementation & rollout of Cloud migration of BIDW system | 1 | Senior Consultant | 2 | 277200 | 554400 |
| 6 | GST Change Management | 1 | Principal Consultant | 2 | 356400 | 712800 |
| 7 | Technical support for IT Infrastructure & Networking (on premise/cloud), NIIT QGR and RFP Compliance Monitoring (50% (1/2 month for every month)) | 1 | Managing Consultant | 1/2 month * 2 = 1 month | 306900 | 306900 |
| 8 | Bid Process Management (On Demand) | 1 | Managing Consultant | 1 | 306900 | 306900 |
| | TOTAL | 8 | | | | 40,98,600 |

- Hence, it was requested to continue the existing PMC i:e Ernst &Young LLP for two months period from 01st April 2022 to 31st May 2022 with same number & type of resources along with same terms & conditions laid down in the work order dated 05.04.2021 issued for original contract.

**Decision of the committee :**

**PIC granted Administrative & Financial approval for extension of existing PMC i:e M/s. Ernst & Young LLP (E&Y) for the period of 2 months from 01st Apr 2022 to 31st May 2022 for Rs.40,98,600/- and applicable taxes thereon.**

==========================================

विषय क्र.२) **Selection and onboarding of Legal Consultant from DIT empanelled agencies for providing legal services to MGSTD, for Rs.11,08,800/-**

**Discussion:**

It is informed that,

- MGSTD had sent a proposal vide no. JC(Mahavikas)/ 2021-22/Legal Consultant/B-1676, Dt.15.11.2021 to PIC for selection and onboarding of Legal Consultant from DIT empanelled agencies for providing legal services to MGSTD.
- Accordingly, PIC meeting held on 06th Dec 2021 granted Administrative and Financial approval for hiring services of a Legal Consultant from DIT empanelled

agencies for Rs.11,08,800/- and applicable taxes thereon, for the period of 4 months during two years.

- After approval from PIC, as per the procedure for the selection of consultancy services explained in the clause no.5 of DIT (MH) GR dtd.09.05.2019, MGSTD issued **'Letter of Invitation' (LOI)** vide no. MGSTD/ Mahavikas/ LOI/ Selection/Legal Consultant_2021/B-1759, dtd. 28.12.2021 to all empanelled agencies and requested for submission of proposals and presentation before PIC for selection & on boarding of Legal Consultant for MGSTD.
- Further, MGSTD vide letter no. MGSTD / Mahavikas /2022-23 / Legal Consultant/ B-1862, Dt.06.04.2022 also communicated to all DIT empanelled consultancy firms about schedule of PIC meeting dated 08th April 2022 for presentation before PIC and requested to attend the meeting for presentation.
- **However, nobody from empanelled agencies attended for presentation before PIC.**

==============================================

विषय क्र.३) **स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयांतर्गत कार्यालयांसाठी एकूण रु.१,१९,२२,०००/- इतक्या अंदाजित खर्चाच्या लॅपटॉप संगणक, प्रिंटर व स्कॅनर खरेदीस मान्यता देण्याबाबत:-**

संगणक सामग्री खरेदीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव (तपशील खालीलप्रमाणे) दिनांक ०८/०४/२०२२ रोजी झालेल्या राज्य प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) बैठकीत मंजुरीस्तव ठेवण्यात आला होता.

| अ.क्र. | तपशील | प्रस्तावित नवीन खरेदी परिमाण संख्या | एका परिमाणाची अंदाजित किंमत | नवीन खरेदी परिमाण सांख्याची अंदाजित एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | संगणक | ५० | ५२००० | २६००००० |
| २. | लॅपटॉप | ११६ | ६०००० | ६९६०००० |
| ३. | प्रिंटर | ७६ | २२००० | १६७२००० |
| ४. | स्कॅनर | २३ | ३०००० | ६९०००० |
| एकूण | | | | १,१९,२२,०००/- |

**समितीचा निर्णय :-** **सदर राज्य प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) बैठकीत संगणक सामग्री खरेदी प्रस्तावातील तांत्रिक विनिर्देश माहिती व तंत्रज्ञान (DIT) विभागकडून मंजूर करून घेणेबाबत निर्देशित करून घेणेत यावे व तदनंतर पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा असे ठरले.**

==============================================

विषय क्रमांक-४ :- डीबी-२ १०.५ या आज्ञावलीच्या ४९ लायसेन्सेसच्या (४७५० Processor Value Units) सन २०२२-२०२३ करिता देखभालीच्या सेवाकराराचे नुतनीकरण करण्यास व त्याकरिता बारा महिन्यांसाठी रुपये १,३०,९९,२२१/- (करांसहित) इतक्या येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याबाबत.

१) वित्त विभाग व संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व संगणकीय प्रणालींच्या डाटाबेस हा डीबी-२ या आज्ञावलीवर आधारीत असल्यामुळे त्याकरिता आवश्यक असलेले डीबी-२ या आज्ञावलीचे एकूण ४४ लायसेन्सेसच्या (४४०० प्रोसेसर व्हॅल्यू युनीटस्) (Processor Value Units - PVU) आणि ५ लायसेन्सेसच्या (३५० प्रोसेसर व्हॅल्यू

युनीटस्) (Processor Value Units - PVU) खरेदीचा व वारंवार नुतनीकरण केलेल्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| डीबी-२ लायसेन्सेसच्या खरेदी व त्यांच्या नुतनीकरणाकरिता आलेल्या खर्चा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कालावधी | युनिटची संख्या | महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांनी दिलेली मंजुरी | मंजुर रक्कम रुपये (सर्व करांसहीत) |
| १ | डीबी-२ च्या ९.५ आज्ञावली सन २००७-२००८ | ८०० युनिटस | खरेदीस दिनांक २९/०३/२००८ च्या पत्रान्वये मंजूरी व खर्चास दिनांक ३१/०३/२००८ या ज्ञापनान्वये मंजूरी | ६७,४४,०००/- |
| २ | डीबी-२ च्या ९.५ आज्ञावली सन २००८-२००९ | ३६०० युनिटस | खरेदीस व खर्चास दिनांक ३१/०३/२००९ च्या ज्ञापनान्वये मंजूरी | १,६३,७८,५६०/- |
| ३ | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली ऑगस्ट, २०१३ ते मार्च, २०१६ या कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास (सन २००९-२०१० ते सन २०११-२०१२ पर्यन्त लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकराराचे नुतनीकरण करण्यात आले नव्हते) | ४४०० युनिटस | दिनांक ०९/०३/२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक-२ अन्वये मान्यता दिली. | १,५१,०४,६१०/- |
| ४ | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास | ४४०० युनिटस | दिनांक १५/०६/२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक-५ अन्वये मान्यता दिली. | ६४,७८,७५९/- |
| ५ | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास | ४४०० युनिटस | दिनांक १५/०२/२०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत आयत्या वेळाचा विषय घेऊन मान्यता दिली. | ६७,९५,८३३/- |
| ६ | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली एप्रिल, २०१८ ते मार्च, २०१९ कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास | ४४०० युनिटस | दिनांक ०४/०१/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक - २ ने मान्यता प्रदान केली आहे. | ७३,६७,३९१/- |
| ७ | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली एप्रिल, २०१९ ते मार्च, २०२० कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा | ४४०० युनिटस | दिनांक ०४/०२/२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक - २ ने | ८१,०४,१३६/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास | | मान्यता प्रदान केली आहे. | |
| ८ | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली ०१ एप्रिल, २०२० ते ३० एप्रिल, २०२१ कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास | ४४०० युनिटस | दिनांक २४/०६/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक - ६ ने मान्यता प्रदान केली आहे. | १,०५,४८,८७६/- |
| ९ | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली ऑगस्ट, २०२० ते जुलै, २०२१ कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास (मध्यवर्ती कोषागार प्रणाली, सेवार्थ, इत्यादीकरिता नव्याने ३५० युनिटस् डीबी-२ लायसेन्सेस घेण्यात आले होते.) | ३५० युनिटस | दिनांक २४/०६/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक - १ ने मान्यता प्रदान केली आहे. | ५०,९८,८२१/- |
| १० | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली दिनांक ०१/०५/२०२१ पासून दि.३०/०४/२०२२ कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास | ४४०० युनिटस | दिनांक ०७/०५/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक - ४ ने मान्यता प्रदान केली आहे. | १,१०,३०,९२३/- |
| ११ | डीबी-२ च्या १०.५ आज्ञावली दि.०१.०८.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ कालावधीकरिता डीबी-२ १०.५ च्या लायसेन्सेसच्या देखभालीचा सेवाकरारास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास | ३५० युनिटस | दिनांक ०७/०५/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विषय क्रमांक - ४ ने मान्यता प्रदान केली आहे | ६,५८,०९५/- |
| | **एकूण रक्कम रुपये** | | | **९,४३,१०,००४/-** |

२) डिबी-२ १०.५ या आज्ञावलीचे लायसेन्सेस (४४०० Processor Value Units) च्या देखभालीच्या सेवाकराराची मुदत दिनांक ३०/०४/२०२२ रोजी संपुष्टात येत आहे. त्या अनुषंगाने डीबी-२ या आज्ञावलीचे एकूण ४९ लायसेन्सेसच्या (४७५० प्रोसेसर व्हॅल्यू युनीटस्) (Processor Value Units - PVU) सदर लायसेन्सेसकरीता देखभालीच्या सेवाकराराचे नुतनीकरण करण्याच्या दृष्टीने मेसर्स आयबीएम यांनी दिनांक ०४/०२/२०२२ व दिनांक २५/०२/२०२२ च्या ई-संदेशाद्वारे कळविले असून, त्यासोबत त्यांनी डीबी-२ या आज्ञावलीचे एकूण ४९ लायसेन्सेसच्या (४७५० प्रोसेसर व्हॅल्यू युनीटस्) (Processor Value Units - PVU) लायसेन्सेसचे सन २०२२-२०२३ (दिनांक ०१/०५/२०२२ ते दिनांक ३०/०४/२०२३ या एक वर्षाकरिता) करिताचे दरपत्रक सोबत सादर केले आहे.

३) त्या अनुषंगाने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे व महाआयटी याच्याकडील सर्व प्रणालींच्या समन्वयकांना दिनांक २५/०२/२०२२ च्या ई-संदेशान्वये अन्वये डीबी-२ लायन्सेसेच्या

नुतनीकरणांच्या अनुषंगाने कळविण्यात आले आहे. सदर ई-संदेशान्वये राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे व महाआयटी यांच्याकडील सर्व प्रणालींच्या समन्वयकांनी अनुक्रमे त्यांच्या दिनांक १६/०३/२०२२ व दिनांक १५/०३/२०२२ ई-संदेशान्वये नुतनीकरण करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.

४) डीबी-२ या आज्ञावलीचे एकूण ४९ लायसेन्सेसच्या (४७५० प्रोसेसर व्हॅल्यू युनीटस) (Processor Value Units - PVU) लायसेन्सेसचे सन २०२२-२०२३ (दिनांक ०१/०५/२०२२ ते दिनांक ३०/०४/२०२३ या एक वर्षाकरिता) करिता देखभालीच्या सेवाकराराचे नुतनीकरणांस रक्कम रुपये १,३०,९९,२२१/- (अक्षरी रुपये एक कोटी तीस लाख नव्याण्णव हजार दोनशे एकवीस फक्त) (करांसहीत) इतका खर्च येणार असल्याचे मेसर्स आयबीएम यांच्या कडून ई-संदेश प्राप्त झाला असून, त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Part No. | Particulars | Start Date | End Date | Quantity | Total Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| E020CLL | IBM DB-2 Enterprise Server Edition Processor Value Unit (PVU) Annual SW subscription & support renewal for 12 months | 01/05/2022 | 30/04/2023 | 4750 | 1,11,01,035/- |
| | Add IGST @ 18% of the order value | | | | 19,98,186.30 |
| | **TOTAL** | | | | **1,30,99,221.30** |
| | **Roundup Total** | | | | **1,30,99,221/-** |

५) उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे IBM DB-२ Enterprise Server Edition Processor Value Unit (४७५० PVU) Annual SW subscription & support renewal for १२ months ४७५० पीव्हीयू लायसेन्सेसकरीता देखभालीच्या सेवाकराराचे नूतनीकरण करणे आवश्यक असल्यामुळे उपरोक्त दराप्रमाणे बारा महिन्यांसाठी रुपये १,३०,९९,२२१/- (अक्षरी रुपये एक कोटी तीस लाख नव्याण्णव हजार दोनशे एकवीस फक्त) (करांसहीत) इतका खर्चास मान्यता मिळावी.

तसेच सदरचा खर्च मुख्य लेखाशिर्ष मागणी क्रमांक जी-५, प्रधान लेखाशीर्ष २०५४ कोषागार व लेखा प्रशासन, गौणशीर्ष (००)(०९७) कोषागार आस्थापना, उपशिर्ष (००)(०२) संगणकीकरणावरील खर्च (२०५४ ०२०९), १७ संगणकावरील खर्च यालेखाशिर्षाखाली सन २०२२-२०२३ मध्ये उपलब्ध होणाऱ्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात येईल.

समितीचा निर्णय :-

**उपरोक्त प्रमाणे संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी दिनांक २३/०३/२०२२ च्या खालील प्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**१) डीबी-२ १०.५ या आज्ञावलीच्या ४९ लायसेन्सेसच्या (४७५० Processor Value Units) सन २०२२-२०२३ (दिनांक ०१/०५/२०२२ ते दिनांक ३०/०४/२०२३ या एक वर्षाकरिता) करिता देखभालीच्या सेवाकराराचे नुतनीकरण करण्यास व त्याकरिता येणाऱ्या रक्कम रु.१,३०,९९,२२१/- (अक्षरी रुपये एक कोटी तीस लाख नव्याण्णव हजार दोनशे एकवीस फक्त) (करांसहीत) इतक्या रकमेस प्रकल्प अंमलबजावणी समितीने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.**

**विषय क्रमांक ५ (आयत्या वेळेचा विषय) :- संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन ११ वा मजला, टिसीएल प्रभादेवी (DC Site) व टिसीएल हैदराबाद(DR Site) या तीन ठिकाणी सन २०२२-२०२३ करीता भारत संचार निगम लि. मुंबई यांचेकडून MPLS Connectivity स्थापित करण्यास व त्यासाठी होणारा खर्च रु. १३,६१,०००/- रकमेचे प्रदान त्यांना करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

संचालनालयाच्या अधिनस्त सर्व ३४ कोषागार कार्यालये, अधिदान व लेखा कार्यालय, संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन, ११ वा मजला, टिसीएल प्रभादेवी(DC Site) व टिसीएल हैदराबाद(DR Site) अशा एकुण ३८ ठिकाणी भारत संचार निगम लि. मुंबई यांचेकडून MPLS Connectivity घेण्यात आली होती. सद्य:स्थितीत एकुण ३८ ठिकाणांपैकी अधिदान व लेखा कार्यालय व ३४ कोषागार कार्यालये ही Web Based Central Server ला जोडण्यात आली आहेत. त्यामुळे ३८ ठिकाणांपैकी ३५ ठिकाणची MPLS Connectivity अकार्यान्वित (Disconnect )करण्यात आली आहे. सध्या संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन ११ वा मजला, टिसीएल प्रभादेवी(DC Site) व टिसीएल हैदराबाद(DR Site) या ३ ठिकाणीच MPLS Connectivity कार्यान्वीत आहे. MPLS Connectivity कार्यान्वित असलेल्या तीन ठिकाणांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाण /कार्यालयाचे नाव | MPLS Connectivity |
|---|---|---|
| १ | टिसीएल प्रभादेवी (DC Site) | 8 mbps |
| २ | संचालनालय लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ११ वा मजला | 256 kbps |
| ३ | टिसीएल हैदराबाद(DR Site) | 512 kbps |

संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन ११ वा मजला, टिसीएल प्रभादेवी(DC Site) व टिसीएल हैदराबाद(DR Site) ही तीन ठिकाणे सेंट्रल सर्व्हरशी जोडण्याकरिता मे. भारत संचार निगम लि. मुंबई यांचेकडून MPLS Connectivity सुरु असल्याने दरवर्षी सदर MPLS Connectivity च्या खर्चाचे आगाऊ प्रदान मे. भारत संचार निगम लि. मुंबई यांना करण्यात येते. चालू वित्तिय वर्ष २०२२-२०२३ म्हणजे दि.०१.०४.२०२२ ते दि.३१.०३.२०२३ या कालावधीकरीता उपरोक्त तीन ठिकाणी पुरविण्यात येणा-या भारत संचार निगम लि. यांच्या MPLS Connectivity च्या खर्चाची एकुण रक्कम रु.१३,६१,०००/-(करांसहीत) ची तीन देयके (रु.२,५२,७४४.२० + रु.३,२८,९८४.०० + रु.७,७९,२७२.००) मे. भारत संचार निगम लि. मुंबई यांनी प्रदानासाठी संचालनालयास सादर केली आहेत. त्याचे प्रदान चालू वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये करावयाचे आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग २, दिनांक १७/०४/२०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग एक ते पाच मधील अनुक्रमांक २७अ, नियम क्रमांक ७६ अन्वये नवीन संगणक यंत्रणा खरेदी करणे किंवा सध्या उपलब्ध असलेल्या संगणक यंत्रणेत वाढ / श्रेणीवाढ करण्यास मंजुरी देणे यासाठी विभाग प्रमुखांना रु.४,००,०००/- पर्यंतचे वित्तिय प्राधिकार असून व त्यापुढे प्रशासनिक विभागास पूर्ण प्राधिकार आहेत.

तरी संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन ११ वा मजला, टिसीएल प्रभादेवी(DC Site) व टिसीएल हैदराबाद(DR Site) या तिन्ही ठिकाणची MPLS Connectivity चालु ठेवणे आवश्यक असल्याने सन २०२२-२०२३ करीता भारत संचार निगम लि. मुंबई त्यावर निश्चितपणे होणारा आवर्ती खर्च रक्कम रु.१३,६१,०००/-(करांसहीत) यास व त्याचे प्रदान भारत

संचार निगम लि. मुंबई यांना करण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समितीची (PIC) तसेच प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत आहे.

यावर होणारा खर्च मागणी क्रमांक "जी-५ प्रधान लेखाशिर्ष २०५४, कोषागार व लेखा प्रशासन, गौण शिर्ष (००)(०९७) कोषागार आस्थापना उपशिर्ष (००)(०२) संगणकीकरणावरील खर्च (२०५४०२०९) योजनेत्तर, दत्तमत १७- संगणकावरील खर्च" या लेखाशिर्षाखाली चालू वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

<u>समितीचा निर्णय</u>

**संचालनालय लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन ११ वा मजला, टिसीएल प्रभादेवी (DC Site) व टिसीएल हैदराबाद (DR Site) या तीन ठिकाणी सन २०२२-२०२३ करिता म्हणजे दिनांक ०१.०४.२०२२ ते दिनांक ३१.०३.२०२३ या कालावधीसाठी उपरोक्त Bandwidth ची MPLS Connectivity स्थापित करण्यास व त्यासाठी होणाऱ्या रु.१३,६१,०००/- इतक्या खर्चाच्या रकमेस प्रकल्प अंमलबजावणी समितीने प्रशासकीय मान्यता दिली.**

==========================================

शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

( शैला ए. )
सचिव (वित्तीय सुधारणा), तथा
अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती, वित्त विभाग.